**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२५**

**ठळक बातम्या**

1. **सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योगासाठी तारणमुक्तकर्ज देणाऱ्या योजनेला अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या हस्ते मुंबईत सुरुवात.**
2. **कुठलीही योजना सरकार बंद करणार नसल्याचा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा पुनरुच्चार.**
3. **उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची 20 फेब्रुवारी रोजी रामटेक इथं महायुतीला बहुमत दिल्याबद्दल अभिवादन सभा.**
4. **इस्रोकडून सॉलिड रॉकेट मोटर्ससाठी जगातला सर्वात मोठा दहा टन वजनाचा प्रोपेलेंट मिक्सर विकसित.**

---------------------------

**एम. नागाराजू/अर्थमंत्री**

**बँकांमधल्या गैरव्यवहारांमुळे खात्यात पैसे अडकून पडलेल्या खातेदारांना अधिक रक्कम देण्याचा सरकारचा विचार आहे. सध्या DICGC मार्फत ५ लाखापर्यंतच्या ठेवी परत मिळतात. ही रक्कम १० लाखापर्यंत वाढवण्याचा सरकारचा विचार असल्याचं वित्तीय सेवा विभागाचे सचिव एम.नागाराजू यांनी आज मुंबईत सांगितलं. न्यू इंडिया को-ऑपरेटिव्ह बँकेतल्या घोटाळ्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना ते बोलत होते. वीमा धारकांना योजना आवडली नाही पहिल्या वर्षी ती परत करता येईल. त्यानंतर त्यांना संपूर्ण वीमा हप्ता परत मिळेल, अशी योजना सुरू केल्याची माहिती त्यांनी दिली.संरक्षण क्षेत्रात निर्यात वाढत असल्याचे त्या म्हणाल्या -**

***डिफेंस में डिफेंस प्रोक्योरमेंट में आत्मनिर्भरता होना है। इसके लिए डिफेंस प्रोडक्शन में जीतने भी इंडस्ट्री एंगेज्ड है। उनके साथ हम पॉलिसी के तहत सपोर्ट करते हैं, उनको हर किस्म का फॅसिलिटी बनाकर देते हैं।उसके कारण आज भारत देश में एक्सपोर्ट ऑफ डिफेंस इक्विपमेंट और उससे कमाई मोर दॅन 24 थाउज़न्ड क्रोर अभी शायद उससे भी बड़ा.***

**गेल्या काही दिवसात देशातल्या शेअर बाजारातून मोठ्या प्रमाणात घसरण सुरू आहे. परदेशी गुंतवणूकदार पैसे काढून घेत असल्यानं ही घसरण सुरू आहे.**

यासंदर्भात अर्थमंत्री निर्मला सीतारामण म्हणाल्या, देशातल्या बाजारपेठांमधून गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळत असल्यानं गुंतवणूकदार पैसे काढून घेत आहे. जागतिक पातळीवर अस्थिरता निर्माण झाल्यावर हे प्रकार होतात, असं वित्त सचिव तुहीन कांत पांडे म्हणाले.

----------------------------

महाकुंभ

प्रयागराजमधल्या महाकुंभमेळ्यामध्ये भाविकांसाठी उभारण्यात आलेलं आणि तब्बल ४० हजार चौरस फूट क्षेत्रात विस्तारलेलं स्वच्छ सुजल गाव संपूर्ण देशासाठी आदर्श ठरलं आहे. विविध सरकारी उपक्रम इथं कार्यान्वित करण्यात आल्यानं हे गाव उत्तर प्रदेशच्या ग्रामीण भागातल्या परिवर्तनाचं समग्र दर्शन घडवणारं ठरलं आहे.

----------------------------

परीक्षा पे चर्चा

परीक्षा पे चर्चा या कार्यक्रमात आज क्रीडापटू मेरी कोम, सुहास येथीराज आणि अवनी लेखरा यांनी विद्यार्थ्यांना परीक्षा काळात ताण व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केलं. सुहास येथीराज यांनी न घाबरता आव्हानांना सामोरे जाण्याचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला -

*द लेसन इज आप अगर डर छोड़ोगे फिर आप अपनी नेचुरल गेम खेलोगे तो कभी भी ये मत सोचो कि सामने कौन है क्योंकि उससे आपको कुछ नहीं मिला आप अपना बेस्ट दो। मैं कन्नड़ मीडियम में पढ़ता था। कर्नाटक में तीन बार अडमिशन नहीं मिला था। स्कूल में की इंग्लिश मीडियम में मिला नहीं। एक तक वो कहेगी ये तो गांव से आया है अगर वहाँ से यहाँ तक अगर डेस्टिनी कृपा करके ला सकती है, आप तो आसमान छू सकते हैं।*

दररोज पूर्ण लक्ष केंद्रित करून अभ्यास केला तर ते टिकवून ठेवू शकाल, असं अवनी लेखरा हिने सांगितलं. तर मेरी कोम यांनी यावेळी बोलताना, जर तुम्हाला आव्हानं स्वीकारायची असतील तर तुम्ही पुरेसे बलवान असलं पाहिजे, असं सांगितलं.

----------------------------

बावनकुळे-लाडकी बहीण

शिवभोजन योजना असो लाडकी बहीण योजना किंवा शेतकऱ्यांची वीज बिल माफी योजना कुठलीही योजना सरकार बंद करणार नसल्याचा पुनरुच्चार महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज केला. नागपूर इथं ते बातमीदारांशी बोलत होते. काही योजनांचा लोकांनी गैरफायदा घेतला, त्याची तपासणी सुरू आहे. योजनांना पात्र असलेल्यांना लाभ निश्चित मिळेल असं बावनकुळे यांनी सांगितलं. स्थानिक निवडणुका लवकर घेण्याबाबत देखील त्यांनी आपली अपेक्षा व्यक्त केली..

*सुप्रीम कोर्टमध्ये ओबीसी आरक्षणासंबंधाने ज्या ज्या बाबी होत्या त्या सरकारनकडण उत्तर आम्ही दिले आहेत. माननीय सुप्रीम कोर्ट आणि जेव्हा निकाल लागेल आमची अपेक्षा आहे की लवकर निकाल लागावा आणि येणारा काळामध्ये हा जो निकाल आहे तो आल्यावर राज्य निवडणूक आयोग याची तातडीने निवडणुका लावेल ही अपेक्षा महाराष्ट्राची आहे जनतेचे आहे कारण आणि स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये नगरसेवक नसणे, जिल्हा परिषदचे मेंबर नसणे, छोटी विकासाला बाधा निर्माण होते आणि म्हणून मला असं वाटतं की तातडीने आपण या निवडणुका झाल्या पाहिजे अशी अपेक्षा आहे.*

----------------------------

राज्यपाल

आपल्या स्थापनेचे १०९ वे वर्ष साजरे करीत असलेल्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठाने अधिकाधिक मुलींना उच्च शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी राज्यातील, विशेषतः ग्रामीण व आदिवासी भागातील, शाळांशी संपर्क वाढवावा, असे आवाहन राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती सी.पी. राधाकृष्णन यांनी आज मुंबईत केलं. राज्यपाल राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला विद्यापीठाचा ७४ वा दीक्षांत समारोह विद्यापीठाच्या पाटकर सभागृहात संपन्न झाला, त्यावेळी ते बोलत होते.

----------------------------

आशिष जैस्वाल

विधानसभेत महायुतीला बहुमत दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे राज्याच्या विविध भागात अभिवादन पर सभा घेत असून ते विदर्भाच्या दौऱ्यावर 20 फेब्रुवारी गुरुवार रोजी रामटेक येथे नगरधन मैदानावर दुपारी 4 वाजता अभिवादन सभेला संबोधित करणार असल्याची माहिती शिवसेनेचे नेते आणि राज्याचे अर्थ राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल

यांनी आज नागपूर येथे पत्रकार परिषदेत दिली. याप्रसंगी शिवसेनेत काही पक्ष प्रवेश देखील होणार असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

-----------------------------

इस्रो

भारतानं सॉलिड रॉकेट मोटर्ससाठी जगातला सर्वात मोठा दहा टन वजनाचा प्रोपेलेंट मिक्सर विकसित केला आहे. हे तंत्रज्ञान भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या सतीश धवन अंतराळ केंद्रानं, बंगळुरू इथल्या केंद्रीय उत्पादन तंत्रज्ञान संस्थेच्या सहकार्यानं विकसित केलं आहे. या मिक्सरचे वजन १५० टन आहे. या मिक्सरमुळे रॉकेट प्रक्षेपणासाठी आवश्यक असलेल्या सॉलिड प्रोपेलेंट घटकांचे अचूक आणि सुरक्षित मिश्रण सुनिश्चित होते. हे तंत्रज्ञान अंतराळ तंत्रज्ञानात भारताच्या वाढत्या स्वावलंबनाचं प्रतीक आहे, असं इस्रोने म्हटले आहे.

-----------------------------

सहकारी संस्थां

आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त जिल्हा उपनिबंधक कार्यालयाच्या पुढाकाराने व सर्व सहकारी संस्थांच्या सहकार्याने वर्षभर विविध उपक्रम घेण्यात येत आहेत. या उपक्रमांमध्ये सहकार क्षेत्रातील संस्थांप्रमाणेच विविध क्षेत्रातील संस्था व नागरिकांचा सहभाग मिळवून व्यापक आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज अकोला इथं दिले. अकोला जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा सहकार विकास समितीच्या बैठकीत ते बोलत होते. जिल्हाधिकारी कुंभार म्हणाले की, वर्षभर आयोजित करण्यात येणा-या उपक्रमांत वैविध्य व अधिकाधिक संस्था, व्यक्तींचा सहभाग मिळवावा. जिल्हयातील ९३६ सेवा सहकारी संस्थांची माहिती राष्ट्रीय सहकारी डेटाबेसवर अपलोड करण्यात आली आहे. सहकारी संस्थांच्या माध्यमातून तालुक्याच्या ठिकाणी गोदाम, सीएससी सेंटर, जनऔषधी केंद्र आदींसाठी प्रयत्न व्हावेत, असेही निर्देश त्यांनी दिले.

-----------------------------

डॉ.विनोद आसुदानी

विदर्भ साहित्य संघाच्या 'ग्रंथ सहवास' तर्फे 'भाषा सखी' या उपक्रमांतर्गत उद्या, 19 फेब्रुवारी रोजी विदर्भ साहित्य संघाच्या ग्रंथालयात दुपारी 4 वाजता साहित्य अकादमी पुरस्काराने सन्मानित डॉ. विनोद आसूदानी यांच्या "हथो पकिडे जा" या सिंधी काव्यसंग्रहातील काही निवडक कवितांचे "उजेडाच्या पलीकडे" या शीर्षकाखाली अभिवाचन आयोजित करण्यात आले आहे.डॉ. विनोद आसुदानी हे

**अभियांत्रिकी विषयाचे प्राध्यापक असून ते आचार्य पदवीने सन्मानित आहेत. ते देशातील पहिले आणि एकमेव अंधकवी आहेत.**

**------------------------------**